N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** छत्रपती संभाजीनगर शहर **P.S.(ठाणे):** पुंडलीक नगर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0475 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**27/11/2025 21:33

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 27/11/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 27/11/2025
**Time From (वेळेपासून):** 10:30 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 13:59 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 27/11/2025 **Time (वेळ):** 21:33 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 031
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 27/11/2025 21:33 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 4 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** एमराँल्ड सिटी, मेहरसिंग नाईक स्कुल जवळ,छत्रपती संभाजीनगर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): बाळासाहेब सदाशीव शिंदे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1981

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,छत्रपती संभाजीनगर ,पुंडलीक नगर,छत्रपती संभाजीनगर शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,छत्रपती संभाजीनगर ,पुंडलीक नगर,छत्रपती संभाजीनगर शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9923338565

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्रीमती लता बाळासाहेब दराडे | | | 1. एमरन सिटी,,रोहाऊस नं 36, , छत्रपती संभाजीनगर ,पुंडलीक नगर,छत्रपती संभाजीनगर शहर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

तक्रारदार पोलीस स्टेशन हजर आल्यानंतर

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दि 27/11/2025

मी बाळासाहेब सदाशीव शिंदे, वय 44 वर्ष, व्यवसाय नोकरी, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर मो.नं. 9923338565

मी सरकार तर्फे फिर्यादी होवुन फिर्याद देतो की, मी वरील प्रमाणे असुन मागील सह महिन्यापासून छत्रपती संभाजीनगर येथे पोलीस उप अधीक्षक म्हणुन नेमणुकीस आहे. दिनांक 27/11/2025 रोजी मा.पोलीस अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग छत्रपती संभाजीनगर यांनी आम्हाला आदेशीत केले की, आपण पोलीस उपअधिक्षक श्रमती संगिता पाटील यांचे सोबत सापळा कारवाई कामी सहायक सापळा अधिकारी म्हणुन जावे. त्यावरून आम्ही पोलीस उपअधिक्षक श्रीमती संगिता पाटील, यांचे कक्षामध्ये गेलो असता त्यांनी आम्हाला सांगितले की, दिनांक 26/11/2025 रोजी तक्रारदार श्रीमती साधना योगेश म्हस्के, वय- 25 वर्ष, व्यवसाय- घरकाम, रा. माळी गल्ली, सावता मंदिरच्या समोर, अब्दिमंडी, दौलताबाद, छत्रपती संभाजीनगर मो.क्र. 9322506167 यांनी समक्ष लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर येथे येवून तक्रार दिली.

मी साधना योगेश म्हस्के, वय- 25 वर्ष, व्यवसाय- घरकाम, रा. माळी गल्ली, सावता मंदिरच्या समोर, अब्दिमंडी, दौलताबाद, छत्रपती संभाजीनगर मो.क्र. 9322506167 हे पोलीस उप अधीक्षक, श्रीमती संगीता पाटील, यांचेकडे तक्रार दिली. त्यावरून श्रीमती संगीता पाटील, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर यांनी तक्रारदार श्रीमती साधना योगेश म्हस्के, यांची दोन पंचासमक्ष लाचलुचपत पतिबंधक विभाग छत्रपती संभाजीनगर येथे त्यांचे स्वहस्ताक्षरात तक्रार घेतली होती की, मी समक्ष अँन्टी करप्शन ऑफिस छत्रपती संभाजीनगर येथे हजर राहुन श्रीमती संगिता पाटील यांचे समक्ष माझ्या हस्तक्षरात तक्रार देते की, मी आज दिनांक 26/11/2025 रोजी श्रीमती संगीता पाटील मॅडम अँन्टी करपशन आफिस, छत्रपती संभाजीनगर यांना भेटुन मला माझे पती श्री. योगेश शंकर म्हस्के, यांनी पोलीस स्टेशन, दौलताबाद, छत्रपती संभाजीनगर येथे माझे व माझे मित्र श्री. राहुल नारायण शेळके, वय-31, व्यवसाय-शेती, रा.मु.पो.वांगी, ता.जि.बीड, मो.नं.9922377610 यांचे विरुध्द तक्रारी अर्ज दाखल केलेला असून सदर तक्रारी अर्जामध्ये मदत करण्यासाठी मला माझ्या फोन नंबर 9322506167 यावर दिनांक 25/11/2025 रोजी 20:34 वा. दौलताबाद पोलीस स्टेशन येथील महिला पोलीस श्रीमती दराडे मॅडम यांनी 8888713446 या मोबाईल नंबर वरुन कॉल करुन सांगितले की, तुझ्यात व तुझा मित्र श्री. राहुल शेळके, तुमच्यात प्रेम संबंध असल्याचे तुझ्या पतीने दिलेल्या तक्रारी अर्जात नमुद आहे. त्यात तुला मदत हवी असेल तर मला तीस हजर रुपये द्यावे लागतील अशी पैशाची मागणी करत असले बाबत श्रीमती संगीता पाटील, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर यांना सांगितले. तेव्हा श्रीमती संगीता पाटील, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र. वि.छत्रपती संभाजीनगर यांनी सविस्तर तक्रार देणे बाबत सांगितलेवरुन तक्रारदार यांनी तक्रार दिली की, माझ्या व माझे पती श्री. योगेश शंकर म्हस्के, यांनी पोलीस स्टेशन, दौलताबाद, छत्रपती संभाजीनगर येथे माझे व माझे मित्र श्री. राहुल नारायण शेळके, वय-31, व्यवसाय-शेती, रा.मु.पो.वांगी, ता.जि.बीड, मो.नं.9922377610 यांचे विरुध्द तक्रारी अर्ज दाखल केलेला असून सदर तक्रारी अर्जामध्ये मदत करण्यासाठी मला माझ्फोन नंबर 9322506167 यावर दिनांक 25/11/2025 रोजी 20:34 वा. दौलताबाद पोलीस स्टेशन येथील महिला पोलीस श्रीमती दराडे मॅडम यांनी 8888713446 या मोबाईल नंबर वरुन कॉल करुन सांगितले की, तुझ्यात व तुझा मित्र श्री. राहुल शेळके, तुम्हच्यात प्रेम संबंध असल्याचे तुझ्या पतीने दिलेल्या तक्रारी अर्जात नमुद आहे. त्यात तुला मदत हवी असेल तर मला तीस हजर रुपये द्यावे लागतील असे म्हणाल्या. त्यानंतर मी महिला पोलीस श्रीमती

दराडे मॅडम यांना मी तुम्हाला उद्या येवून भेटते असे सांगितल्यावर त्यांनी मला तु व तुझे मित्र राहुल दोघे येवून पोलीस स्टेशन येथे येवून भेटा असे म्हणाल्या.

तरी मी व माझे मित्र राहुल आज दिनांक 27/11/2025 रोजी पोलीस स्टेशन, दौलताबाद येथे महिला पोलीस श्रीमती दराडे मॅडम यांना भेटण्याकरीता जाणार आहोत. आपण आपल्या पथकासह येवून त्यांनी मला माझ्या पतीने माझ्या व माझे मित्र यांचे विरुध्द दिलेल्या तक्रारी अर्जामध्ये मदत करण्याकरीता लाचेची मागणी केल्यास आपण त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करावी. महिला पोलीस श्रीमती दराडे मॅडम स्टेशन, दौलताबाद हया पैशाची मागणी करत असल्या बाबत कल्पना दिली आहे. परंतु मला महिला पोलीस श्रीमती दराडे मॅडम यांना लाच देण्याची इच्छा नाही.

मी व माझे मित्र राहुल आज दिनांक 26/11/2025 रोजी पोलीस स्टेशन, दौलताबाद येथे महिला पोलीस श्रीमती दराडे मॅडम यांना भेटण्याकरीता जाणार आहोत, सदर अर्जामध्ये मदत करून देण्यासाठी पैसे अथवा लाचेची मागणी केल्यास त्यांचे विरूध्द कायदेशीर कारवाई करावी. महिला पोलीस श्रीमती दराडे मॅडम स्टेशन, दौलताबाद यांचा व माझा कोणताही पुर्वीचा उसनवारीचा व्यवहार नाही तसेच माझी आणि श्रीमती दराडे यांची कोणती ही दुश्मनी अगर वैर नाही. मी माझी वरील तक्रार स्वहस्तक्षरात स्वता: लिहीली ती बरोबर व खरी आहे.अशी लेखी तक्रार दिल्याने पंचांची खात्री झाल्यावर पंचांनी व श्रीमती संगीता पाटील, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर यांनी त्यावर सह्या केल्या.

त्यानंतर श्रीमती संगीत पाटील, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि.छत्रप्ती संभाजीनगर यांनी दिनांक 26/11/2025 रोजी तक्रारदार यांना होणाऱ्या लाच मागणीची पडताळणी पोलीस स्टेशन दौलताबाद, छत्रपती संभाजीनरगर येथे करण्यात आली असुन त्यामध्ये तक्रारदार व अभिकथित लोकसेवक श्रीमती लता बाळासाहेब दराडे, यांचे झालेले संभाषण त्यात तक्रारदार साधना योगेश म्हस्के म्हणाल्या इथल्या इथच निपटून घ्या अभि.कथित लोकसेवक श्रीमती दराडे म्हणाल्या सावकाश सावकाश बोल मला कळतं पण आता काय करती त्या नालायक काटटं त्यानी तुला फोन बीन केला का गं श्रीमती साधना योगेश म्हस्के म्हणाल्या मग आता मामा काय म्हणले आयका मामा म्हणले आता माझ्या नई हे मी संध्याकाळ पर्यंत बॅकेतून काढून आणतो तुला उद्या सकाळी देतो तुला त्याच त्याला फोन करतो मामा हे ना त्याला पण फोन करतो म्हणी ते पीएसआयच्या जागी मामाचा मुलगा लागलाना त्याला पण फोन करतो म्हणी अभि.कथित लोकसेवक श्रीमती दराडे म्हणाल्या आता मग मॅडमला समोर माझी चुक झाली मला माफ करा मला काय करु नका अस श्रीमती साधना योगेश म्हस्के म्हणाल्या अस बोलू का अभि.कथित लोकसेवक श्रीमती दराडे म्हणाल्या अस कारण ती बाई लय थई थई त्यानी लई धिंगाना केलाय त्यांनी बीड पोलीसांना हिला अटक करा मग कोणत्या परिस्थीती मध्ये अटक करुन आणा मला सांग तु माझ्या बहीणी सारखी तु मला सांग माला बर वाटण राहुल आता माला बहीणी सारखी हे मला बर वाटण झाल्या गोष्टी तुला मी इकड आली तुम्ही रहाना एकत्र बाहेर तमाशा दाखू नकाना दाखु नका मिसळू नका तुझ अन याच काहीच नई श्रीमती साधना योगेश म्हस्के म्हणाल्या उद्या किती वाजे पर्यंत येवू अभि. लोकसेव श्रीमती दराडे म्हणाल्या तु माझ्या भावा सारखा हे राहुल तु माझ्या भावा सारखा हे मी तुला जे सांगल मला तुमच्याकडून काहीच नको श्रीमती साधना योगेश म्हस्के म्हणाल्या बर उद्या किती वाजेपर्यंत येवू आम्ही पैशे घेवून तक्रारदार यांचा मित्र श्री.शेळके मॅडम थोड फार सुट दिली असती तक्रारदार श्रीमती म्हस्के म्हणाल्या उद्याच्या दिवस उद्याच्या दिवस अभि. लोकसेव श्रीमती दराडे म्हणाल्या आता भेटतीका ती ठणठण बोंबा मारीन माला तक्रारदार श्रीमती म्हस्के म्हणाल्या बर आता आखरी आखरी ठरल याच्यानंतर वीस हजार दिल्याच्या नंतर माला काहीच त्रास नई झाला पाहिजे माला अभि. लोकसेव श्रीमती दराडे म्हणाल्या काहीच नई करुन देते तुला करुन देते मला दोन दोन एक हजार रुपये तर दे वरती तक्रारदार श्रीमती साधना म्हस्के म्हणाल्या आता काहीच नई हे ना तक्रारदार यांचे मित्र श्री.शेळके हे सॉल झाल का वाटल मी स्वत: छत्रपती संभाजीनगर मध्ये येवून देइन अभि. लोकसेव श्रीमती दराडे म्हणाल्या राहुल मला कळत प्रत्येक सगळ सोंग करता येत पैशाच सोंग करता येत तक्रारदार यांचे मित्र श्री.शेळके तीच म्हण काय हे वीस हजार रुपये गेले तर जावू द्या पण त्रास नई झाला पाहिजे एवढच तिच म्हणण हे तक्रारदार साधना योगेश म्हस्के, तक्रारदार यांचे मित्र श्री. राहुल नारायण शेळके व अभि लोकसेवक लता बाळासाहेब दराडे, यांच्यामध्ये तक्रारदार यांचे व त्यांचे मित्रा विरुध्द पोलीस स्टेशन दौलताबाद येथे प्राप्त तक्रारी अर्जामध्ये मदत करण्यासाठी वीस हजार लाचेची मागणी करून वीस हजार रुपये लाचेची रक्कम स्वीकारण्यास संमती दिली असल्याचे निष्पण झाले असुन त्याबाबतचा लाच मागणी पडताळणी पंचनामा दोन पंचा समक्ष दिनांक 26/11/2025 रोजी करण्यात आले बाबत पोलीस उप अधीक्षक, श्रीमती संगीता पाटील यांनी आम्हाला सांगितले.

आज दिनांक 27/11/2025 रोजी आम्ही लाचलुचपत प्रतिबंधक विभाग छत्रपती संभाजीनगर येथे कार्यालयात कर्तव्यावर हजर असतांना मला मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग छत्रपती संभाजीनगर यांनी

दिलेल्या तोंडी आदेशाप्रमाणे मी पोलीस उप अधीक्षक श्रीमती संगीता पाटील, यांचे कक्षात हजर राहुन त्यांचेसह नेमलेल्या सापळा पथक व पंचासह लाचलुचपत प्रतिबंधक विभाग छत्रपती संभाजीनगर येथुन सापळा कारवाई करीता शासकीय वाहने पोलीस स्टेशन दौलताबाद छत्रपती संभाजीनगरकडे जाण्यासाठी 10.30 वाजता रवाना झालो. त्यानंतर आम्ही पोलीस स्टेशन दौलताबाद, छत्रपती संभाजीनगर जवळ सुरक्षित ठिकाणी पोहोचल्यावर त्याठिकाणी तक्रारदार हजर झाले. पोलीस उप अधीक्षक संगीता पाटील यांनी त्यानंतर तक्रारदार श्रीमती साधना योगेश म्हस्केयांना लाच रक्कम हजर करणेबाबत विचारणा केली. त्यावेळी तक्रारदार श्रीमती साधना योगेश म्हस्के यांनी त्यांच्याकडील 500/- रुपये दराच्या 40 चलनी नोटा असे एकुण 20000/- रुपये लाचेची रक्कम आमचे समक्ष हजर केली. त्यानंतर आम्ही तक्रारदार म्हस्के व पंचांना पंचांना अँथ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावुन, अल्ट्रा व्हायलेट दिव्याचे प्रकाशात हिरवट रंगाची चकाकी असलेबाबत खात्री करुन दिली. त्यानंतर सापळा कारवाईचे अनुषंगाने सापळापुर्व संपुर्ण कार्यवाही केलेनंतर अँथ्रासिन पावडर लावलेले 20,000/- रुपये तक्रारदार श्रीमती म्हस्के यांचे पर्समध्ये पहिल्या कप्यात ठेवले. त्यानंतर तक्रारदार श्रीमती म्हस्के, दोन्ही पंच व सापळा पथकास सापळा कारवाईचे अनुषंगाने सुचना देवुन, श्रीमती दराडे, महिला पोलीस हवालदार ब.नं. 2041 पो.स्टे.दौलताबाद, छत्रपती संभाजीनगर यांनी लाच रक्कम स्विकारल्यानंतर तक्रारदार यांना त्यांचे केसांवर हात फिरवण्याचे इशारा करण्याच्या सुचना दिल्या. त्यानंतर पंचांसमक्ष पुन्हा सापळा कारवाईचे अनुषंगाने व्हाईस रेकॉर्डर मध्ये SanDisk कंपनीचे 16 जीबी क्षमतेचे नवीन मेमरी कार्ड घालुन 11.46 वा चालु करुन ते तक्रारदार श्रीमती म्हस्के यांचेकडे देवून कोणाला दिसणार नाही असे ठेवण्यात आले. तक्रारदार श्रीमती म्हस्के, त्यांचे मित्र शेळके व पंच क्रं 1 यांना सापळा कारवाईकामी ऑटो रिक्षाने पोलीस स्टेशन दौलताबाद येथे रवाना केले. त्यानंतर तक्रारदार पो.स्टे. दौलताबाद येथे पोहचल्यानंतर आलोसे श्रीमती दराडे, यांना त्यांचे मोबाईल नंबर 8888713446 वर कॉल केला असता त्यांनी मी सध्या पोलीस स्टेशन येथे नसून बाबा पेट्रोलपंप छत्रपती संभाजीनगर येथे आहे. तर तु इथे येवून जा असे सांगितले. त्यावरुन ते परत सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आले व ही हकीकत पंच क्रमांक 1 यांनी आम्हास सांगितली. त्यानंतर तक्रारदार श्रीमती म्हस्के, त्यांचे मित्र श्री. शेळके, पंच व सापळा पथक बाबा पेट्रोलपंप छत्रपती संभाजीनगर कडे जाण्यास सांगितले.

फिर्यादीमधील मजकुर हा सि.सि.टि.एन.एस. प्रणाली च्या 8000 अक्षर क्षमतेपेक्षा जास्त असल्याने पुढील पुर्ण फिर्यादीचा मजकुर समाविष्ट होत नसल्याने सविस्तर फिर्याद ही सोबत जोडण्यात आलेली आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

ASHOK RAMALU BHANDARE(I (Inspector)) / PI **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): ASHOK RAMALU BH/
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PI

डि.ओ.अधिकारी
पो.स्टे.पुंडलिकनगर
छत्रपती संभाजीनगर(शहर)

त्यानंतर बाबा पेट्रोलपंप, छत्रपती संभाजीनगर येथे पोहचल्यावर 12:37 वा. तक्रारदार यांचे मोबाईल फोनवरुन आलोसे श्रीमती दराडे, यांना त्यांचे मोबाईल नंबर 8888713446 वर कॉल केला असता त्यांनी सांगितले की, शिवाजीनगर येथे या, त्यानंतर आम्ही शिवाजीनगर, छत्रपती संभाजीनगर येथे सुरक्षीत ठिकाणी पोचलो 13:17 वा. आलोसे श्रीमती दराडे, यांना त्यांचे मोबाईल नंबर 8888713446 वर कॉल केला असता त्यांनी ऍमरॉन सिटी, येथे येण्यास सांगितले. त्यानंतर तक्रारदार श्रीमती म्हस्के, त्यांचे मित्र शेळके व पंच क्रमांक 1 श्रीमती पवार यांची भेट घेण्याकरीता अभि.कथीत लोकसेवक श्रीमती दराडे, यांचे राहते घर रो हाऊस नं. 36, एमरॉन सिटी, गारखेडा परिसर, छत्रपती संभाजीनगर यांची भेट घेण्यासाठी रवाना केले. त्यांचे पाठोपाठ पंच क्रं. 2 व सापळा पथक असे आमचेकडील शासकीय वाहनाने गारखेडा परिसर, छत्रपती संभाजीनगर येथून आडोशाला जावुन तक्रारदार नजरेत राहील अशा रितीने थांबलो. त्यानंतर तक्रारदार व पंच क्रं.1 हे अभी.कथीत लोकसेवक श्रीमती दराडे यांची भेट घेण्यासाठी त्यांचे घरामध्ये जाताना दिसले. त्यानंतर तक्रारदार हे श्रीमती दराडे यांची भेट घेवुन त्यांचे घरातून बाहेर आले घरातून बाहेर येवुन पथकास दिसेल अशारितीने त्यांनी त्यांचे केसावर हात फिरुन अभिकथीत लोकसेवक याने पैसे स्विकारल्याचा नियोजीत इशारा 13.59 वा केला. सदर इशारा समजुन आम्ही, पंच क्रं.2 व सापळा पथक सक्रीय होवुन आम्ही आलेल्या तक्रारदारास सोबत घेवुन श्रीमती दराडे यांचे घराकडे गेलो. त्यानंतर लागलीच तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर बंद केले. तसेच त्यांचे घरातील त्यांची मुलगी समृध्दी जॉन अंबलढगे व त्यांचे पती श्री. जॉन जेम्स अंबिलढगे आहे त्याच स्थितीत थांबण्यास सांगीतले. त्यानंतर आम्ही सर्व सापळा पथक, तक्रारदार व पंच क्रं. 2 यांचे समक्ष पंच क्रं.1 यास सुरक्षीत ठिकाणावरुन निघाल्यापासुन ते नियोजीत इशारा होईपर्यंत काय घडले याबाबत विचारले असता, पंच क्रं.1 याने सांगीतले की, मी व तक्रारदार, तक्रारदार यांचे मित्र असे श्रीमती दराडे यांची भेट घेतली. त्यानंतर तक्रारदार श्रीमती म्हस्के व त्यांचे मित्र श्री.शेळके यांनी श्रीमती दराडे यांना कामासंदर्भात चर्चा केली. त्यानंतर श्रीमती दराडे यांनी पैशाबाबत विचारुन लाचेची रक्कम देण्याकरीता सांगितले व तक्रारदार यांनी सदरची रक्कम मोजून घ्या असे सांगितलेवर श्रीमती दराडे यांनी सदरची रक्कम मोजून रक्कम बरोबर असल्याचे सांगितले. त्यानंतर सदरची रक्कम रुममधील टेबलवर ठेवण्याचे सांगितले.

त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना विचारणा केली असता त्यांनी देखील पंच क्र 1 यांनी दिलेल्या माहिती प्रमाणेच वरीलप्रमाणे हकीकत सांगीतली. त्यानंतर आम्ही व्हाईस रेकॉडर चालु करुन त्यामधील तक्रारदार, श्रीमती म्हस्के, त्यांचे मित्र श्री.शेळके आणि श्रीमती दराडे यांच्या दरम्यान झालेले संभाषण ऐकले असता तक्रारदार श्रीमती म्हस्के यांनी **मोजून घ्या पुर्ण विस हजार** असे म्हणाले त्यानंतर श्रीमती दराडे **मोजनं तु** म्हणाल्या. तक्रारदार, श्रीमती म्हस्के **मला नाही मोजता येत न** असे म्हणाले त्यानंतर तक्रारदार यांचे मित्र श्री शेळके तिला मोजता येत नाही ती हाय सहावी पास असे म्हणाले. त्यानंतर श्रीमती दराडे **बरोबर हाय** म्हणाल्या. तक्रारदार, श्रीमती म्हस्के **तुम्हाला एक रुपयापण कधीच कमी नाही देणार** असे म्हणाले असे झालेल्या संभाषणामध्ये लाचमागणीची रक्कम स्विकारलेली आहे. यावरुन श्रीमती दराडे यांनी तक्रारदार यांचे व त्यांचे मित्र विरुध्द पोलीस स्टेशन दौलताबाद, छत्रपती संभाजीनगर येथे दाखल तक्रारी अर्जामध्ये मदत करण्यासाठी 20000/ रुपये लाच रक्कम अभिकथीत लोकसेवक श्रीमती दराडे यांनी स्वत: स्विकारल्याचे निष्पन्न झाले.

आम्ही पंचासमक्ष श्रीमती दराडे यांचे राहते घरी सोफ्यावर बसलेल्या स्त्री यांना पंच क्रमांक 1 श्रीमती श्रीमती सुमित्रा रामकिसन पवार यांनी त्यांचे नाव पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्रीमती लता बाळासाहेब दराडे वय 37 वर्ष, व्यवसाय नौकरी, पद पोलीस हवालदार ब.नं.2041 पो.स्टे.दौलताबाद, छत्रपती संभाजीनगर रा. एमरॉन सिटी, गारखेडा परिसर, रो.हाऊस नं. 36, छत्रपती संभाजीनगर असे असल्याचे सांगीतले. तेव्हा श्रीमती संगीता पाटील, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर यांनी अशी ओळख करुन देवुन लाचेची रक्कम कोठे ठेवली याबाबत विचारले असता त्यांनी त्यांचे राहते घरामध्ये टेबलवर ठेवल्याचे सांगितले. तेथे हजर असलेले पंच क्र 1 व 2 यांचे समक्ष तपासले असता टेबलवर लाचेची रक्कम ठेवल्याचे दिसून आले. तेव्हा सदरची लाचेची रक्कम पंच क्रं.2 यांचे मार्फतीने ताब्यात घेवुन सापळा पुर्व कारवाईवेळी तक्रारदार याचे कडे दिलेल्या नोटांच्या क्रमांकाची खात्री करता त्या त्याच क्रमांकाचे नोटा असल्याचे दिसुन आले. तसेच पंचासमक्ष अल्ट्राव्हॉयलेट प्रकाशाचे उजेडात श्रीमती लता दराडे, यांचे राहते घरातील टेबलवर हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली. सदरची लाचेची 20,000/- रुपये रक्कम व मोबाईल पंचासमक्ष जप्त केले. तसेच श्रीमती लता दराडे, यांना ताब्यात घेवुन त्यानंतर पुढील कारवाईकामी ला.प्र.वि. कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथे येवुन पंचनामा करुन पुर्ण केला आहे.

तरी दि. 26/11/2025 रोजी पोलीस स्टेशन दौलताबाद, छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी यातील मुळ तक्रारदार श्रीमती साधना म्हस्के, रा. माळी गल्ली, सावता मंदिरच्या समोर, अब्दिमंडी, दौलताबाद, छत्रपती संभाजीनगर मो.क्र. 9322506167 यांचे व त्यांचे मित्र श्री. राहुल नारायण शेळके यांचे विरुध्द पो.स्टे.दौलताबाद, छत्रपती संभाजीनगर येथे दाखल तक्रारी अर्जामध्ये मदत करण्यासाठी अभिकथीत लोकसेवक श्रीमती. लता बाळासाहेब दराडे वय 37 वर्ष, व्यवसाय नौकरी, पद पोलीस हवालदार ब.नं.2041 पो.स्टे.दौलताबाद, छत्रपती संभाजीनगर रा. एमरॉन सिटी, गारखेडा परिसर, रो.हाऊस नं. 36, छत्रपती संभाजीनगर यांनी तक्रारदार यांचेकडुन 20,000/- रुपये लाचेची मागणी करुन 20000/- रुपये लाचमागणी केल्याचे निष्पन्न झाले होते.

त्यानंतर दिनांक 27/11/2025 रोजी सापळा कारवाई दरम्यान श्रीमती लता दराडे, यांचे रा. एमरॉन सिटी, गारखेडा परिसर, रो.हाऊस नं. 36, छत्रपती संभाजीनगर येथील राहत्या घरामध्ये सदरची लाच रक्कम आरोपी लोकसेवक श्रीमती लता बाळासाहेब दराडे वय 37 वर्ष, व्यवसाय नौकरी, पद पोलीस हवालदार ब.नं.2041 पो.स्टे.दौलताबाद, छत्रपती संभाजीनगर रा. एमरॉन सिटी, गारखेडा परिसर, रो.हाऊस नं. 36, छत्रपती संभाजीनगर यांनी स्वत: स्विकारली आहे. सबब श्रीमती लता बाळासाहेब दराडे वय 37 वर्ष, व्यवसाय नौकरी, पद पोलीस हवालदार ब.नं.2041 पो.स्टे.दौलताबाद, छत्रपती संभाजीनगर रा. एमरॉन सिटी, गारखेडा परिसर, रो.हाऊस नं. 36, छत्रपती संभाजीनगर यांच्या विरोधात माझी भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम सन 1988 चे कलम 7 प्रमाणे सरकार तर्फे कायदेशीर फिर्याद आहे.

माझा फिर्यादी जबाब मी संगणकावर टंकलिखीत केलेला असुन, तो मी वाचुन पाहीला असता बरोबर व खरा आहे.

फिर्याद दिली सही

पोलीस ठाणे पुंडलिक नगर छत्रपती संभाजीनगर (श)

डि.ऑ.अधिकारी
पो.स्टे.पुंडलिकनगर
छत्रपती संभाजीनगर(शहर